

## पुरुषोत्तम मास

चांद्रवर्ष आणि सूर्यवर्ष यांच्यातील फरकामुळे वर्षातील महिना, सण आणि ऋतूंमधला साधला गेलेला ताळमेळ बिघडण्याचा संभव निर्माण होतो. हा फरक दूर करण्यासाठी दर तीन वर्षांनी ३३ दिवसांच्या एक 'अधिक' मासाची योजना केली गेली. या वर्षी वैशाख मास हा अधिक मास आहे.

प्राचीन हिंदुस्थानी खगोलशास्त्रज्ञांनी सूर्यमान आणि चंद्रमानाचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास करून दिवस, तिथी, महिना, नक्षत्र आणि राशींवर आधारित अशा चांद्र-सौर कालगणना पद्धतीचा अवलंब केला आहे. चंद्र आणि सूर्याच्या सापेक्ष भ्रमण गतीमध्ये पडणाऱ्या फरकामुळे चांद्रवर्ष आणि सूर्यवर्षात दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक पडत जातो. कृषिप्रधान हिंदुस्थानी जीवनमानात दैनंदिन व्यवहार आणि अध्यात्माची उत्तम सांगड घालण्यासाठी सण, व्रतवैकल्ये, नैमित्तिक आणि काम्यकर्मे विशिष्ट ऋतूत, विशिष्ट तिथीला, ठरावींक काळातच करण्याचा प्रघात हिंदुस्थानी पूर्वसूरींनी घालून दिल्याचा आढळतो.

चांद्रवर्षाप्रमाणे मुळातच हा अधिक आलेला मास असल्यामुळे एरवी वर्षभरात तिथीवार येणारे सण या महिन्यात नसतात, म्हणूनच बहुधा हा महिना लग्न-मुंजी-वास्तुशांतीसारख्या नैमित्तिक कर्मांसाठी देखील ताज्य ठरवला गेला असावा. वस्तुत: हिंदुस्थानी संस्कृतीला कुठलीही गोष्ट त्याज्य असणे मान्य नाही. निसर्गातील प्रत्येक लहान-मोठ्या, सजीव-निर्जीव वस्तू, वास्तू आणि घटनेला आपल्या संस्कृतीने सामावून घेतले आहे. म्हणूनच सण-उत्सवांसाठी हा महिना त्याज्य ठरवल्यावर, निष्काम सत्कर्मे करून आपला आध्यात्मिक उत्कर्ष साधण्यासाठी दर तीन वर्षांनी उत्तम संधी देणारा मास असा अधिक उच्च दर्जा त्याला दिला गेला. मलमास या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आणि त्याज्य ठरवलेल्या या आगंतुक मासाला, ''पुरुषोत्तम श्रीकृष्णाने स्वत:च्या नावाचे अधिष्ठान देऊन पुण्यप्रद म्हणून घोषित केले,'' यासारख्या पुराणकथा म्हणजे कालगणना आणि अध्यात्म अशा दोन्ही दृष्टीने असणारे अधिक मासाचे महत्त्व लोकमानसावर प्रतिबिंबित करण्याचा उत्तम प्रयत्न होय!

पौराणिक कथा आणि रूढी यातील सुप्त संकेत जाणून घेणे सर्वात महत्त्वाचे असते. अधिक मासानिमित्त सुचवलेल्या रूढींचा आणि व्रतांचा ज्ञानपूर्वक अभ्यास करून आजच्या गतिमान काळाला अनुरूप असे कोणते सत्कर्माचे संकल्प आपल्याला करता येतील याचाही विचार प्रत्येकाने करायला हवा. अधिक

महिन्यात छिद्र असलेल्या वस्तू, जसे म्हैसूरपाक, अनारसे यांचे दान करण्याचा परिपाठ आहे. या परंपरेचा बारकाईने जेव्हा मनुष्य विचार करतो तेव्हा छिद्र म्हणजे नेमके काय आणि त्याचा त्याग करून नेमके काय साध्य होणार याचेही चिंतन होऊ लागते. एखादा शेतकरी आपल्या शेताची निगुतीने मशागत करतो, मोठ्या कष्टाने विहिरीतून पाणी काढून पिकांमध्ये सोडतो; परंतु त्याच्या शेतात जर उंदीर-घुशींची असंख्य बिळे केलेली असतील तर पिकांपर्यंत पाणी पोहोचेल का? पिकापर्यंत पाणी पोहोचण्यासाठी त्याला प्रथम ही बिळे बुजवण्याचे कष्ट घेतले पाहिजेत. आपल्यातील त्रुटींचा, दोषरूपी छिद्रांचा त्याग करण्याचा संकल्प अधिक मासानिमित्त सर्वप्रथम करणे अपेक्षित आहे.

अधिक मासाला पौराणिक कथेप्रमाणे 'पुरुषोत्तम मास' असेही संबोधण्यात येते. पुरुषार्थाला प्रार्थनेची उत्तम जोड जो देऊ शकतो तो पुरुषोत्तम! सीताहरणानंतर मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्र ईश्वराचे नाव घेत नुसते बसून राहिले नाहीत तर नियोजनबद्ध प्रयत्न करून त्यांनी संघटना बांधली आणि अंतिमत: अन्यायाचे परिमार्जन घडवून आणले. प्रत्यक्ष ईश्वरी अंश असणाऱ्या प्रभू रामचंद्रांनासुद्धा चौदा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत प्रयत्नांची शिकस्त करत संयमी धैर्य दर्शवावे लागले. सारांशाने प्रार्थनेला पुरुषार्थाची जोड आणि प्रयत्नांना प्रार्थनेची जोड देऊन भौतिक आणि आध्यात्मिक जीवनात यश प्राप्त करण्याचा संकल्प या पुरुषोत्तम मासानिमित्त प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

असंक्रांतो यदा मास: प्राप्यतेमानवै: प्रिये।
महोत्सवस्तदा कार्य आत्मनोहितकांक्षिभि:।।

सूर्याचे एका राशीतून दुसऱ्या राशीत संक्रमण होते, ती संक्रांत, अधिक मासात सूर्याचे असे राश्यांतर होत नाही, त्यामुळे या मासात संक्रांत येत नाही. म्हणूनच या मासात पूर्ण प्रभाव चंद्राचा असतो, असे म्हटले जाते. चंद्र हा मनाचा कारक मानला गेला आहे. ज्याप्रमाणे चंद्र कलेकलेने वाढतो त्याप्रमाणे या अधिक मासात मन लावून केलेली सत्कर्मे ही आपल्या दोषांचे क्षालन उत्तम रीतीने आणि 'अधिकस्य अधिकम् फलम्।' या न्यायाने गुणाकाराने करतात असे आपले अध्यात्मशास्त्र म्हणते. अध्यात्मातला सगळ्यात छुपा आणि क्षालन करण्यासाठी सर्वात अवघड असणारा दोष म्हणजे अहंकार! 'मी श्रेष्ठ, माझी साधना श्रेष्ठ, माझा पंथ श्रेष्ठ' असा 'मी'चा अहंकार बाळगून आपल्या मताचा दुराग्रह ठेवणाऱ्या साधकांची अध्यात्मात वानवा नाही. सतत रंग बदलणाऱ्या सरड्याच्या मूळ

रंगावरून वाद विकोपाला नेणारे दोन मित्र जेवढे मूढ असतात त्याहीपेक्षा अधिक मूढ 'माझाच मार्ग ईश्वरापर्यंत पोहोचतो', असे म्हणत ईश्वरी प्रतीकांमध्ये आणि साधनामार्गांमध्ये भेदाभेद निर्माण करणारे साधक असतात. स्वत:ची दृष्टी अधिकाधिक व्यापक, सर्वसमावेशक आणि विशाल करण्याचा निश्चय करणे हा अधिक मासाचा सर्वोच्च संकल्प होय!

- बापट गुरुजी